myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

# प्राचीन काळातील कर रचना (Taxation System) विकास आणि वाटचाल - अर्थशास्त्रीय चिकित्सक अभ्यास

ज्योती प्रदिप भोई.

छत्रपती शिक्षण मंडळाचे,

कला व वाणिज्य महाविद्यालय ,पडघा. भिवंडी.

मोबा.न. ९९६०९८७१९६

Email Add :dr.jyotibhoi@gmail.com

शोधनिबंध गोषवारा

प्राचीन भारतातील कर प्रणालीचा अभ्यास केवळ ऐतिहासिक नव्हे तर अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे. कर हे राज्याचे उत्पन्नाचे प्रमुख साधन असून त्याचा परिणाम उत्पादन,वितरण, उपभोग, गुंतवणूक आणि सामाजिक कल्याण यावर होत होता. प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेत करप्रणालीला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. राज्यकारभार, संरक्षण, न्यायव्यवस्था आणि लोककल्याणकारी कामांसाठी महसूल उभारणी हे आवश्यक मानले जात होते . विशेषतः कौटिल्य यांच्या अर्थशास्त्र या ग्रंथात कररचनेचे सविस्तर वर्णन आढळते.

प्राचीन काळातील कर रचना ही केवळ राज्याचा खजिना भरण्यासाठी नव्हती, तर समाजाचा समतोल राखण्यासाठी होती. श्रीमंतांकडून जास्त आणि गरिबांकडून कमी कर घेणे हे सूत्र तेव्हाही पाळले जात असे.

प्राचीन काळातील कर रचना (Taxation System) ही अतिशय शिस्तबद्ध आणि प्रगत होती. विशेषतः कौटिल्य (चाणक्य) आणि मनुस्मृती यांच्या विचारांवर ही व्यवस्था आधारित होती. राजाने प्रजेकडून कर कसा घ्यावा, याचे वर्णन करताना कौटिल्याने "ज्याप्रमाणे मधमाशी फुलाला इजा न पोहोचवता त्यातील मध गोळा करते, त्याप्रमाणे राजाने प्रजेला त्रास न देता कर घ्यावा" असे म्हटले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्राचीन काळातील कर रचना त्याची आकारणी,पद्धती,प्रकार, विकास व वाटचाल यासंबंधित अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. कारण ही वाटचाल भारतीय आर्थिक प्रशासनाच्या परिपक्वतेचे प्रतीक मानली जाते.त्यामुळे आजही बळी व कर हे प्रमुख महसूल स्त्रोत असून कर देणे हे नैतिक कर्तव्य मानले जात आहे.

त्यामुळे कराच्या मार्फत समाज, प्रशासन, राज्यकारभार, संरक्षण, न्यायव्यवस्था आणि लोककल्याणकारी कामांसाठी महसूल उभारणी हे आवश्यक असून त्याचे महत्त्व व आवश्यकता आज आधुनिक युगातही तितकेच स्थान प्राप्त करून आहेत. ज्याचा फायदा आपल्या राज्य आणि केंद्र सरकारला होत आहे.

## Keyword

मनुस्मृती, महसूल, बळी

### प्रस्तावना

प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेत करप्रणाली ही राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत होती. शेतीप्रधान अर्थव्यवस्था, व्यापार, वाणिज्य आणि हस्तकलेवर आधारित उत्पन्न यावर कर आकारले जात होते . कालानुरूप करप्रणाली अधिक संघटित, शास्त्रीय नियमबद्ध होत गेलेली दिसून येते. प्राचीन काळी प्रजेचे संरक्षण केल्याबद्दल राजा कर आकारणी करत असे. ही आकारणी निश्चित प्रमाणात नसल्याकारणाने परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल होत गेले. प्राचीन भारतातील करपप्रणाली ही राज्यकारभार टिकवण्यासाठी अत्यावश्यक होती वैदिक काळातील साधा व नैतिक स्वरूपाच्या कर रचनेपासून मौर्यकालीन वैज्ञानिक व्यवस्थेपर्यंत आणि पुढे मध्ययुगीन जमीन मोजणी पद्धती पर्यंत करप्रणाली सतत विकसित होत गेलेली आपणास या अभ्यासावरून दिसून येते.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

प्राचीन भारतातील करप्रणाली ही राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा कणा होती. बळी व कर हे प्रमुख महसूल स्रोत असून कर बहुधाधान्य जनावरे उत्पादन अशा वस्तू स्वरूपात घेतले जात असे. महसूल संकलनासाठी **समाहर्ता** अधिकारी नेमले जात असे होते चाणक्य यांच्या अर्थशास्त्र ग्रंथात शास्त्रीय कर रचनेचे सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे. मौर्यकालीन महाजनांच्या उदया नंतर आणि विशेषतः चाणक्य यांच्या अर्थशास्त्र ग्रंथामुळे कररचना अधिक शास्त्रीय झाली हे प्रस्तुत शोधनिबंधात अभ्यासावरून सिद्ध होत आहे.

## वैदिक काळातील कर रचना :-

वैदिक काळ (इ.स.पूर्व 1500 ते 600) हा भारतीय आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेच्या घडणीचा प्रारंभिक टप्पा मानला जातो. या काळात करप्रणाली साधी, नैतिक आणि कर्तव्यभावनेवर आधारित होती. कर हा राजाच्या उपजीविकेसाठी नसून राज्यरक्षण व लोककल्याणासाठी घेतला जात असे. कराला त्या काळात “बलि”, “कर”, “भाग” अशा संज्ञा होत्या. करप्रणाली प्रामुख्याने स्वेच्छेने आणि धार्मिक कर्तव्य म्हणून स्वीकारली जात असे. कराची वसुली वस्तुरूपाने (धान्य, पशुधन, लोकर, धातू) केली जात असे.

कर हा ग्रामपातळीवर गोळा केला जाई , राजाचे अधिकारी किंवा ग्रामप्रमुख यांची मदत घेतली जाई. तसेच कर वसुलीत अन्याय होऊ नये याची काळजी घेतली जात असे. वैदिक साहित्यात राजाला **“प्रजापालक”** मानले गेले आहे.ऋग्वेद आणि अथर्ववेद मध्ये राजाच्या कर्तव्यांबाबत उल्लेख आढळतो.राजा हा प्रजेच्या कल्याणासाठी कर घेणारा संरक्षक आहे, शोषक नाही — अशी संकल्पना होती.

पूर्व वैदिक कालखंडाचा जर विचार केला तर सुरुवातीस राजा हा मुख्यता युद्ध नेता होता. आपल्या वस्तीचे रक्षण करणे व लूट मिळवणे हे त्याचे कौशल्य असे व हे दोन्ही त्याच्या पदास आवश्यक गुण होते. तो ऐच्छिक भेटी आणि वस्तू रुपातील देणगी स्वीकारत असे व त्यासाठी **बली** ही संज्ञा वापरली जाई. त्या शब्दाचा आणखीन एक अर्थ देवाने दिलेली देणगी तेव्हा कोणताही कर

नव्हता की ज्यावर राजा आपला हक्क सांगू शकेल, त्याला भूमीवरही काही स्वामीत्व नव्हते तर यशस्वी गोग्रहणांमधील काही भागांवर त्याचा हक्क असेल जेव्हा भागांची वाटणी होईल तेव्हा सहाजिकच त्याच्या मोठ्या हिश्यावर राजा हक्क सांगत असे. शुल्काचाही उल्लेख या प्राचीन साहित्यामध्ये येतो **शुल्क** म्हणजे शब्दशः किंमत अथवा वस्तूचे मूल्य, नंतरच्या काळात राजा सुप्रतिष्ठित झाल्यावर वेगवेगळ्या करांसाठी या तीनही म्हणजेच बलि,भाग,शुल्क या संज्ञा वापरल्या जाऊ लागल्या, असे एकंदरीत प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासावरून दिसून येते.

वैदिक काळातील करांचे प्रकार :-

1. बलि (Bali)

बलि हा वैदिक काळातील एक महत्त्वाचा कर होता.प्रजेकडून राजाला दिला जाणारा नियमित कर म्हणून हा कर धार्मिक व सामाजिक कर्तव्य मानला जाई.

सुरुवातीला "बलि" म्हणजे देवाला अर्पण केलेली भेट किंवा अन्न अर्पण असा यामागे वापर होता. नंतर राजाला दिला जाणारा नियमित कर म्हणून त्याचा वापर झाला. प्रामुख्याने धान्य, पशुधन, फळे, इतर कृषी उत्पन्न स्वरूपात दिला जात असे. हा रोखीपेक्षा वस्तुरूपात (in kind) घेतला जाई, यामागचा उद्देश म्हणजे राजाच्या प्रशासनासाठी खर्च भागवणे, संरक्षण (सेना) व्यवस्था, धार्मिक व सामाजिक कार्यांसाठी निधी उभा करणे असा होता तसेच हा कर सक्तीचा नव्हता; तो प्रजेने स्वेच्छेने किंवा परंपरेनुसार दिला जात असे (विशेषतः ऋग्वेदीय काळात). पुढील काळात तो नियमित कराच्या स्वरूपात झाला.

2. भाग (Bhaga)

भाग" म्हणजे हिस्सा किंवा वाटा.शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनातील काही हिस्सा राजाला दिला जात असे. साधारणपणे उत्पादनाचा १/६ वा भाग घेतला जात असे. भाग हा वैदिक काळातील एक महत्त्वाचा कर होता. हा कर मुख्यतः धान्य व इतर कृषी उत्पादनाच्या स्वरूपात घेतला जाई.रोख रकमेऐवजी वस्तुरूपात (in kind) वसूल केला जात असे. या कराचा उद्देश राज्यकारभार चालविणे, सैन्य व्यवस्था व संरक्षण,सार्वजनिक व धार्मिक कार्यांसाठी निधी उपलब्ध करणे असा असल्याचा या अभ्यासावरून स्पष्ट होते की, भाग ही संकल्पना पुढे उत्तरवैदिक व धर्मशास्त्रीय काळात अधिक स्पष्टपणे दिसून येते.

3. शुल्क (Shulka)

शुल्क हा वैदिक काळातील एक महत्त्वाचा कर होता. "शुल्क" म्हणजे शुल्क किंवा कर (Fee / Toll). व्यापार आणि देवाणघेवाण यावर लावला जाणारा कर.हा कर वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर आकारला जाई तसेच सीमारेषा, बाजारपेठ, बंदरे किंवा मार्गांवर घेतला जात असे. काही वेळा आयात-निर्यात वस्तूंवरही आकारला जात होता. या कर आकरण्याबद्दल व्यापार नियंत्रण ठेवणे, राज्याला महसूल मिळवून देणे,रस्ते व सुरक्षा व्यवस्थेसाठी निधी उभारणे असा उद्देश या करामागे होता. हा कर मुख्यतः व्यापारी वर्गावर लागू होत असे. राज्याच्या आर्थिक उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत होता.

व्यापारावर आणि आयात-निर्यातीवर आकारला जाणारा कर म्हणून या करास विशेष महत्व होते.

4. उपहार / दक्षिणा :-

वैदिक, महाजनपद आणि मौर्य काळात उपहार व दक्षिणा या दोन संकल्पना धार्मिक, सामाजिक व राजकीय जीवनात महत्त्वाच्या होत्या. या थेट कर नसल्या तरी अर्थव्यवस्थेशी त्यांचा निकट संबंध होता. आदर, निष्ठा किंवा स्नेह म्हणून दिलेली भेटवस्तू राजा, ऋषी, गुरु किंवा मान्यवरांना दिली जात असे. या वस्तू कधी वस्तुरूपात तर कधी धान्य, सोने, जनावरे, वस्त्रे या स्वरूपात असत. यावरून आपणास असे दिसून येते की त्याकाळी प्रजेला राजाप्रदे आदर आणि आपुलकी असल्यामुळे अशा प्रकारच्या भेट वस्तू राजाला प्राप्त होत होत्या. राजाला प्राप्त प्रजेकडून उपहारात उत्सव असेही म्हणत. काही वेळा जिंकलेल्या राज्यांकडून राजाला दिलेला उपहार हा राजकीय अधीनतेचे प्रतीक असे. कधी कधी या कराचे स्वरूप कधी स्वेच्छेने तर कधी अप्रत्यक्ष बंधनकारक असे यामुळे राज्याच्या संपत्तीत भर पडत असे.

दक्षिणा हा वैदिक काळात यज्ञ, पूजा किंवा शिक्षणानंतर गुरु/पुरोहितांना दिलेले मानधन.यज्ञानंतर ऋत्विजांना दक्षिणा देणे अनिवार्य मानले जाई.

गायी, सोने, भूमी इत्यादी दक्षिणारूपात दिले जात.शिक्षण पूर्ण झाल्यावर शिष्याने गुरुंना दिलेली गुरुदक्षिणा महत्त्वपूर्ण मानली आहे . यची काही उदाहरणे आपण महाभारतातील कथांमध्ये पाहतो त्या म्हणजे, एकलव्य याने आपल्या गुरु द्रोणाचार्यांना अंगठा गुरुदक्षिणा म्हणून दिला. ज्यामध्ये गुरुप्रती कृतज्ञ भाव दिसून येतो.

उपहार व दक्षिणा या संकल्पना प्राचीन समाजातील धर्म, शिक्षण आणि राजकीय संरचना यांच्याशी निगडित होत्या. त्या करप्रणालीचा भाग नसल्या तरी अप्रत्यक्षपणे आर्थिक व्यवस्थेला आधार देत होत्या.

5. हिरण्य

'हिरण्य' या शब्दाचा मूळ अर्थ सोने असा आहे. परंतु प्राचीन भारतीय प्रशासनात त्याचा अर्थ रोख/नगदी कर (Cash Tax) असा विकसित झाला. वैदिक व उत्तरकालीन संदर्भीय अभ्यासानुसार असे दिसून येते की प्रारंभी अर्थव्यवस्था वस्तुविनिमयावर आधारित असल्याने कर धान्य, जनावरे, वस्तू यांच्या रूपात घेतले जात.पुढे व्यापार आणि नाणेप्रणाली विकसित झाल्यावर काही कर रोख स्वरूपात घेतले जाऊ लागले — यालाच हिरण्य म्हणत.

हिरण्य ही संकल्पना प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेतील वस्तुविनिमयापासून चलनाधारित अर्थव्यवस्थेकडे झालेल्या संक्रमणाचे प्रतीक आहे. त्यामुळे करप्रणाली अधिक संघटित आणि आधुनिक स्वरूपाकडे वाटचाल करत असल्याचे दिसते. अर्थशास्त्रमध्ये 'हिरण्य' हा शब्द रोख महसूल या अर्थाने वापरलेला आढळतो.चाणक्य यांनी राज्याच्या उत्पन्नाचे विविध स्रोत सांगताना धान्य (भाग) व हिरण्य (नगदी कर) यांचा उल्लेख केला आहे.जमीन महसूल, व्यापार, खाणकाम इत्यादींतून काही हिस्सा रोख स्वरूपात घेतला जाई.

6. उपरिकर:-

हा प्राचीन भारतीय करप्रणालीतील एक अतिरिक्त (Supplementary) कर होता. मुख्य करांव्यतिरिक्त विशिष्ट परिस्थितीत किंवा विशिष्ट मालमत्तेवर तो आकारला जाई. 'उपरि' + 'कर' = मुख्य करावर अतिरिक्त आकारणी, नियमित भू-राजस्व

(भाग) व्यतिरिक्त घेतला जाणारा कर. विशेषतः जमीन, तात्पुरती मालमत्ता किंवा भाडेपट्टीच्या जमिनीवर आकारला जाई. चाणक्य यांनी मुख्य करांव्यतिरिक्त पूरक करांची कल्पना मांडली आहे. पुढील गुप्तकालीन शिलालेखांतही 'उपरिकर'सारख्या अतिरिक्त आकारणीचा उल्लेख आढळतो. मुख्य भू-कराव्यतिरिक्त आकारला जाणारा कर. काही वेळा भाडेकरू शेतकरी किंवा तात्पुरते जमीनधारक यांच्यावरही राज्याच्या अतिरिक्त खर्चासाठी (युद्ध, आपत्ती, सार्वजनिक कामे) असा खर्च भागवण्यासाठी या कराची आकारणी केली जात असे.

या अभ्यासावरून स्पष्ट होते की, उपरिकर ही संकल्पना दर्शवते की प्राचीन भारतीय करप्रणाली लवचिक व बहुपदरी होती. मुख्य करांशिवाय राज्याला आवश्यकतेनुसार अतिरिक्त महसूल उभारण्याची व्यवस्था अस्तित्वात होती.

7) व्यवसाय/उद्योग कर

प्राचीन काळात कारागीर, व्यापारी, खाणकाम, वनसंपत्ती इत्यादींवर हा कर आकारला जातो. प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेत व्यवसाय, उद्योग आणि व्यापारावर विविध प्रकारचे कर आकारले जात होते. राज्याच्या महसुलाचा हा एक महत्त्वाचा स्रोत होता. विशेषतः अर्थशास्त्र या ग्रंथात याबाबत सविस्तर माहिती मिळते.

8)व्यापार कर - हा आयात–निर्यात वस्तूंवर आकारला जाणारा कर बाजारपेठेत वस्तू विक्रीसाठी आणताना आकारला जाई. सीमारेषा, बंदरे आणि नाक्यांवर हा कर वसूल केला जात असे.

तर प्राचीनकालीन अभ्यासावरून असेही दिसून येते की, कौटिल्य यांच्या मते, राज्याने व्यापारावर नियंत्रण ठेवून ठराविक दराने कर घ्यावा, जेणेकरून राज्याला महसूल मिळेल आणि व्यापाऱ्यांवर अन्याय होणार नाही.

9)पण / विक्रीकर - वस्तूंच्या विक्रीवर आकारला जाणारा कर. हा विशेषतः कौटिल्य यांच्या अर्थशास्त्र या ग्रंथात पण या चलनाचा उल्लेख आढळतो. व्यापार, वेतन, दंड आणि कर वसुलीसाठी पण ही चलनएकक वापरली जात असे.

आधुनिक भारतात विक्रीकराची जागा आता GST (Goods and Services Tax) ने घेतली आहे.

myresearchgo  Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

10) उत्पादन कर (Excise Type Tax) -

मद्य, धातू, मीठ, वस्त्र इत्यादी उत्पादनांवर कर

काही उद्योगांवर राज्याचा एकाधिकार (Monopoly) होता.

11)हस्तकला व कारागीर कर

सुवर्णकार, लोहार, सुतार, विणकर यांसारख्या कारागिरांकडून कर वसूल केला जात होता. त्यांच्या उत्पन्नानुसार किंवा उत्पादनानुसार आकारणी केली जात असे.

12)खाण व वनउद्योग कर

खाणीतील धातू, रत्न इत्यादींवर कर आकारला जात असे. वनसंपत्ती (लाकूड, मध, औषधी वनस्पती) यावर महसूल गोळा केला जात असे.

13) दंड (Fines)

दंड म्हणजे कायद्याचे उल्लंघन केल्यास राजाकडून आकारली जाणारी आर्थिक शिक्षा. प्राचीन भारतात दंड ही फक्त शिक्षा नसून राज्याच्या महसुलाचा एक महत्त्वाचा स्रोत होती. सामाजिक नियमभंग, चोरी, कर्ज न फेडणे इत्यादींसाठी दंड आकारला जाई. दंडाची रक्कम व्यक्तीच्या सामाजिक स्थितीनुसार बदलत असे.कौटिल्य यांच्या अर्थशास्त्र मध्ये दंडव्यवस्थेचे सविस्तर वर्णन आढळते.

दंडनीती (Dandaniti) – राज्यकारभाराचा मुख्य आधार होता. गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दंड ठरवला जाई. दंडाची रक्कम पण (Pana) या चलनात निश्चित केली जात असे.

करचुकवेगिरी, भ्रष्टाचार, मोजमापातील फसवणूक यांसाठी कठोर दंड होते.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

14) विष्टी (Visti): हा कराचा असा प्रकार होता जिथे कारागीर किंवा मजूर पैशांऐवजी महिन्यातून एक दिवस राजासाठी मोफत सेवा देत असत.

15) करा (Kara): फळबागा आणि बागायती शेतीवर लावला जाणारा वार्षिक कर.

प्राचीन काळातील व्यवसाय/उद्योग कर हे केवळ महसुलाचे साधन नव्हते, तर व्यापार नियमन आणि आर्थिक स्थैर्य राखण्यासाठीही महत्त्वाचे होते. राज्य नियंत्रणाखालील उद्योग, शुल्कव्यवस्था आणि कारागीर कर यांमुळे आर्थिक शिस्त निर्माण झाली होती.

मौर्य साम्राज्य काळात करप्रणाली अत्यंत संघटित होती.कौटिल्य यांनी उद्योग व व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियम, परवाने आणि दंडव्यवस्था स्पष्ट केली होती.उद्योगांचे निरीक्षण करण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक

दर व मोजमापांवर नियंत्रण व कर चुकवणाऱ्यांवर कठोर शिक्षा ठरवण्यात आली होती.

करांचे संकलन आणि प्रशासन अधिकारी: कर गोळा करण्यासाठी विशेष अधिकारी असत. मौर्य काळात 'समाहर्ता' हा मुख्य कर संकलक असे, तर 'संनिधाता' हा कोषाध्यक्ष (Treasurer) असे. सवलती: दुष्काळ, महापूर किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात राजा शेतकऱ्यांचा कर माफ करत असे. तसेच विद्वान ब्राह्मण, स्त्रिया आणि दिव्यांग व्यक्तींना करातून सूट दिली जात असे.

गोळा केलेला कर प्रामुख्याने संरक्षण: लष्कराचा पगार आणि शस्त्रास्त्रांची खरेदी, लोककल्याण: रस्ते, विहिरी, विश्रामगृहे आणि सिंचन व्यवस्था (धरणे) बांधण्यासाठी तसेच

प्रशासन, राजदरबारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन यासाठी उपयोग केला जात होता.

**निष्कर्ष**

कौटिल्यांनी मांडलेली करव्यवस्था ही प्राचीन भारतातील सर्वाधिक विकसित व सुसूत्र आर्थिक रचना मानली जाते. यात कृषी, व्यापार, उद्योग, दंड अशा सर्व क्षेत्रांचा समावेश होता, त्यामुळे राज्य मजबूत व समृद्ध राहिले. प्राचीन भारतातील करप्रणाली ही राज्यव्यवस्थेचा आर्थिक कणा होती. वैदिक काळातील बली, भाग, शुल्क यांसारख्या प्राथमिक स्वरूपातील करांपासून सुरुवात होऊन, महाजनपद व मौर्यकालात ती अधिक संघटित, नियमबद्ध आणि तत्त्वाधिष्ठित झाली. विशेषतः कौटिल्य यांच्या अर्थशास्त्र मध्ये करव्यवस्थेचे शास्त्रीय, नियोजनबद्ध आणि अर्थशास्त्रीय विश्लेषण आढळते. करांचा उद्देश केवळ महसूल नव्हता, तर सामाजिक सुव्यवस्था, संरक्षण आणि प्रशासन चालविणे हा व्यापक हेतू होता. कररचना उत्पादनाधारित (Agrarian-based) होती; शेती हा मुख्य महसूल स्रोत होता. व्यापारवाढीसोबत शुल्क, सीमाशुल्क आणि विक्रीसंबंधी कर विकसित झाले. दंड आणि जप्ती यांसारख्या उपायांनी आर्थिक शिस्त आणि कायद्याचे पालन सुनिश्चित केले. कर आकारणीमध्ये "न्याय व समतोल" या तत्त्वांचा विचार करण्यात आला होता.

प्रस्तुत शोधनिबंधात प्राचीन कर रचना अर्थशास्त्रीय चिकित्सक दृष्टीकोनातून पाहता, प्राचीन करप्रणाली ही आधुनिक करव्यवस्थेची पायाभरणी मानली जाऊ शकते. जरी त्या काळातील व्यवस्था कृषिप्रधान आणि मर्यादित व्यापारी चौकटीत होती, तरी तिच्यातील नियोजन, नियंत्रण, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही तत्त्वे आजही लागू पडतात. प्राचीन भारतीय कर रचनेची वाटचाल ही साध्या, प्रथाधारित करांपासून शास्त्रशुद्ध आणि केंद्रीकृत प्रणालीकडे झालेली प्रगती दर्शवते. त्यामुळे ती केवळ ऐतिहासिक अभ्यासाचा विषय नसून आधुनिक सार्वजनिक वित्तशास्त्रासाठीही मार्गदर्शक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात अभ्यासपूर्वक मांडण्यात आले आहे की, प्राचीन अर्थव्यवस्थेतील कर रचना ते आधुनिक अर्थव्यवस्थेत आकारले जाणारे कराचे विविध स्वरूप यामध्ये प्रगतीचे विविध टप्पे पार केलेले आहेत. जे देशाच्या विकसितेसाठी महत्त्वपूर्ण आहेत. प्राचीन भारतीय कर रचनेतील तत्त्वनिष्ठता, उत्तरदायित्व आणि आर्थिक शिस्त ही आजच्या करप्रणालीसाठीही प्रेरणादायी ठरते.

myresearchgo  Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

संदर्भ पुस्तके


1) कौटिलिय अर्थशास्त्र -

2) स्टेट नेट इतिहास -प्रशांत देशमुख -विद्याभारती प्रकाशन

3) द पेग्विन हिस्टरी ऑफ इंडिया प्रारंभ पासून इसवी सन १३०० पर्यंतच्या प्राचीन भारताचा इतिहास - रोमिला थापर- के सागर प्रकाशन